www.sahyandrinews.com

Scan QR code to visit... Epaper Portal

# दैनिक सह्याद्रीचा राखणदार

• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •

• (महाराष्ट्र) • वर्ष ०१ ले • अंक १२७ • Title - Code :- MAHMAR49513 • रविवार दि.४ फेब्रुवारी २०२४ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

Scan QR code to visit... Epaper Portal

# मी १६ सप्टेंबरलाच मंत्रिपदाचा राजीनामा दिलाय-छगन भुजबळ

## मुख्यमंत्री साहेब शिवरायांची शपथपूर्ण झाली, तर मागासवर्गीय आयोग कशासाठी?

**अहमदनगर-मला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा अवमान करायचा नाही, पण प्रश्न निर्माण झाले आहेत. तुम्ही २७ तारखेला मोर्चाला सामोरे गेला विरोध नाही, पण तुम्ही त्या मोर्चात मराठ्यांना आरक्षण देऊन छत्रपती शिवाजी महाराजांची शपथ घेतलेली पूर्ण केल्याचे जाहीर केले. त्यामुळे शिवरायांची शपथ पूर्ण झाली असेल, तर मागासवर्गीय आयोग कशासाठी? असा थेट सवाल मंत्री छगन भुजबळ यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना करत हल्लाबोल केला.सरकारमध्ये राहतो, मग राजीनामा द्या, विरोधक बोलतात तर माझे सहकारी पक्षातील नेते देखील मला विचारतात. त्यांना मी सांगतो की, मी १७ नोव्हेंबर पहिली रॅली अबंड येथे घेतली. त्या आधीच १६ सप्टेंबर २०२३ रोजी मी मंत्रिमंडळाचा राजीनामा दिलेला आहे. त्यानंतर मी अंबडच्या सभेला रवाना झालोय. अडीच महिने मी शांत राहिलो, वर्तमानपत्रातून पुढे व विरोधकांकडून काहीही बोलले जात आहे. पण एवढंच सांगतो की,ओबीसीसाठी शेवटपर्यंत लढणार आहे.**




मी एकच उद्देश ठेवला आहे. ओबीसींचा विकास व आरक्षण वाचवणे हा माझे ध्येय आहे.उपोषणवाले साहेब म्हणतात बजेटमधून आरक्षण मिळाले तर पाहा, अरं काय मोठा जोक झाला आहे. पोलिस तक्रार घेत नाहीत, अख्ख मंडल आयोगाला चॅलेंज करून संपून टाकणार, कुणबी, ओबीसी आरक्षण घ्यायचे आहे. दादागिरी, काही मागतं, उपोषण उपोषण कसंल उपोषण, तुम्ही झुकलं, वाकाल, तर लोक तुमच्यावर उभे राहतील. एकीने राहा, अशी साद छगन भुजबळ यांनी घातली,छगन भुजबळ म्हणाले की, नाभिक समाजाच्या कर्पुरी ठाकुरांना भारतरत्न दिला, यासाठी पीएम मोदींचे अभिनंदन करतो. मोदींनी ओबीसी ऋण मान्य केलं. ते पुढे म्हणाले की, २७ तारखेला गुलाल उधळला, तर परत उपोषण कशासाठी? अशी विचारणा भुजबळ यांनी मनोज जरांगे पाटील यांना केली. अध्यादेश कळत नाही, अधिसूचनेचा मसूदा कळत नाही आणि म्हणतात आरक्षण मिळालं, अशी टीका त्यांनी केली.त्यांनी सांगितले की, राज्यात गेल्या काही दिवसांपासून उन्माद सुरु आहे. ओबीसी नेत्यांच्या घरासमोर शिवीगाळ सुरु आहे. २७ तारखेला गुलाल उधळला असेल, तर उपोषण कशासाठी? अशी विचारणा त्यांनी केली. जरांगे यांनी घोषणा केल्यानंतर आमचे अधिकारी ताबडतोब निघतील आणि म्हणतील हे घ्या ते घ्या. मात्र, लढणाऱ्यांना काही मिळत नाही. यांना लगेच मिळतं. मराठा समाजाला विरोध नाही, वेगळं आरक्षण द्या अशी आमची मागणी आहे. आमच्या ताटात देऊ नको इतकंच म्हणणं आहे. ते मात्र, म्हणतात ओबीसीतून द्या.३६० कोटी रुपये खोटे रेकॉर्ड तयार करण्यासाठी देण्यात आले का? अशी विचारणा भुजबळ यांनी केली. कुणबी जिथं म्हटलं आहे त्या अक्षरात बदल आहे, त्यामुळे कुणबी प्रमाणपत्र देता येत नाही, असे मुख्याध्यापकचं पत्र आहे. कोणाशी लग्न केलं तरी तुम्ही आरक्षण पात्र ठरणार नाही असे सुप्रीम कोर्टाचे जजमेंट आहे. खोटी वंशावळ जोडण्याचे प्रकार सुरू आहेत.तसेच झुंडशाहीने कोणी आरक्षण घेतल्यास त्याला विरोध करता येईल, असा सुप्रीम कोर्टाचा निकाल आहे. मराठा समाजाला आरक्षण मिळाले नाही, तर ओबीसीला मिळणाऱ्या सर्व सुविधा द्या, मग ब्राह्मण, जैन आशा सर्वच समाजाला द्या अशी मागणी त्यांनी केली. ज्या दिवशी मागणी केली त्या दिवशी अधिसूचना निघते असे का? आम्हाला सांगावे लागते जे मराठा समाजाला देता ते ओबीसी समाजाला द्या. एक समिती सथापन केली त्यात मराठा नेते आहेत त्यांना सर्व सवलती दिल्या जात आहेत, असे भुजबळ म्हणाले.





# छत्रपती शिवाजी महाराजांचे विचार घराघरात पोहचविणार-सांस्कृतिक कार्यमंत्री ना.मुनगंटीवार

## 'जाणता राजा' प्रयोगाला हजारो चंद्रपूरकरांचा उदंड प्रतिसाद



### सोमवारचा शेवटचा प्रयोग सर्वांसाठी खुला

चंद्रपूर येथे जाणता राजा या महानाट्याचे आयोजन ४ फेब्रुवारी पर्यंत करण्यात आले होते, मात्र ना. सुधीर मुनगंटीवार यांनी चंद्रपूर जिल्ह्याला विशेष बाब म्हणून येथे एक दिवस जास्त म्हणजे ५ फेब्रुवारीपर्यंत 'जाणता राजा'चे प्रयोग वाढविण्याची घोषणा केली. दररोज सायंकाळी सहानंतर या प्रयोगाला सुरुवात होणार आहे. ५ फेब्रुवारीचा प्रयोग सर्वांसाठी खुला ठेवण्यात आला आहे. जिल्हा प्रशासनाने उद्यापासून प्रथम येणाऱ्यास प्राधान्य देण्याचे ठरवले असून प्रवेशिकांची गरज असणार नाही. त्यामुळे सोमवारी प्रयोगाच्या शेवटच्या दिवशी मोठ्या संख्येने नागरिकांनी या महानाट्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन पालकमंत्री ना. मुनगंटीवार यांनी केले.

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

स्वराज्याच्या रक्षणासाठी अठरापगड जातींना एकत्र आणून दडपशाहीविरूद्ध लढा देत आपल्याला अस्तित्व मिळवून देणाऱ्या शिवबाला सर्व विचारधारेच्या नागरिकांनी हृदयात स्थान द्यावे असे मार्मीक आवाहन करत राज्याचे सांस्कृतिक कार्य मंत्री ना. सुधीर मुनगंटीवार यांनी हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रेरणादायी विचारांचा वारसा 'जाणता राजा' या महानाट्याच्या माध्यमातून राज्यातील प्रत्येक घरात पोहोचविण्यासाठी शासन प्रयत्नशील असल्याचे (शुक्रवारी) सांगितले.

शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकाला ३५० वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने सांस्कृतिक कार्य मंत्री ना. सुधीर मुनगंटीवार यांच्या पुढाकारातून सांस्कृतिक कार्य विभागामार्फत 'जाणता राजा' या महानाट्याचे प्रयोग राज्याच्या सर्व जिल्ह्यांमध्ये आयोजित करण्यात येत आहे. चंद्रपूरच्या चांदा क्लब मैदानावर चार दिवस या महानाट्याचे प्रयोग आयोजित करण्यात आले आहे. त्याचा शुभारंभ ना. मुनगंटीवार यांच्या हस्ते हजारोंच्या उपस्थितीत झाला. यावेळी आमदार सुधाकर अडबाले, भाजपा जिल्हाध्यक्ष हरीश शर्मा, महानगराचे जिल्हाध्यक्ष राहुल पावडे, जिल्हाधिकारी विनय गौडा,सपना मुनगंटीवार,माजी जिल्हाध्यक्ष देवराव भोंगळे, माजी महानगर अध्यक्ष डॉ. मंगेश गुलवाडे, माजी महापौर राखी कंचर्लावार,जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक जॉन्सन, पोलीस अधीक्षक मुमुक्षा सुदर्शन,महानगरपालिका आयुक्त विपीन पालीवाल आदींची प्रमुख उपस्थिती होती.'छत्रपती शिवरायांचे चरित्र आम्हाला कायम प्रेरणादायी आहे. त्यांचे विचार महाराष्ट्रातच नाही तर देश-विदेशात पोहोचविण्याचा निर्धार आम्ही केला आहे. लंडनमध्ये तर छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा उभारण्यात येणार आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या शौर्याचे साक्षीदार ठरलेले १२ गडकिल्ले युनेस्कोच्या जागतिक वारसा स्थळांच्या यादीत समाविष्ट करण्यासाठी प्रस्तावित करण्यात आले आहेत. हे

### जाणता राजा' प्रयोगाला चंद्रपूरकरांचा उदंड प्रतिसाद

**छत्रपती शिवाजी महाराजांचे व्यक्तिमत्व प्रभावीपणे मांडणाऱ्या 'जाणता राजा' या महानाट्याला जिल्ह्याच्या विविध भागातील जनतेने मोठ्या संख्येने हजेरी लावून उदंड प्रतिसाद दिला. प्रेक्षकांची अलोट गर्दी व 'छत्रपती शिवाजी महाराज की जय', 'जय भवानी, जय शिवाजी'चा गजर आसमंतात निनादला**

किल्ले जागतिक यादीत समाविष्ट होतील असा मला विश्वास आहे. त्यानंतर संपूर्ण भारतातील हा ऐतिहासिक वारसा अभिमानाने बघेल याची मला खात्री आहे,' असे ना. मुनगंटीवार म्हणाले. चंद्रपूर येथे देखील शिवाजी महाराजांची सर्वात सुंदर प्रतिकृती स्थापन करण्यात येईल, असे आश्वासन त्यांनी दिले. तसेच छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीला, दिनांक १९ फेब्रुवारी रोजी सातारा येथे देशगौरव प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांना शिवाजी महाराजांच्या नावाचा सर्वात मोठा पुरस्कार देवून त्यांना गौरविण्यात येणार असल्याचेही ना. मुनगंटीवार यांनी सांगितले. छत्रपती शिवाजी महाराजांच्या ३५० व्या राज्याभिषेक वर्षानिमित्त राज्य शासनातर्फे विविध उपक्रम राबविण्यात आल्याचे ना. मुनगंटीवार यांनी सांगितले. देशभरातील विविध ठिकाणचे पवित्र जल एकत्र करून रायगड येथे जलाभिषेक करण्यात आला. तसेच आग्रा येथील औरंगजेबाच्या दिवाण-ए-खास या महालामध्ये शिवजयंती उत्सव साजरा करणे, अफजलखानाच्या कबरीचे अतिक्रमण हटविणे, प्रतापगडावरील भवानी मातेच्या मंदिराला चांदीचे छत्र अर्पण करणे, रायगडावर शिवराज्याभिषेक मिरवणूक सोहळ्यासाठी चांदीची पालखी रायगड उत्सव समितीस भेट देणे, मुंबई येथे पुरातत्त्व विभागामार्फत आयोजित शिवकालीन शस्त्रास्त्रांचे प्रदर्शन, विशेष लोगोचे प्रसारण करून शासकीय कामकाजात त्याचा वापर, शिवकालीन होन तसेच छत्रपती शिवाजी महाराजांचे वडील श्री. शहाजीराजे यांच्यावरील विशेष टपाल तिकिटाचे अनावरण, मॉसाहेब जिजाऊ यांच्या जयंती दिनानिमित्त त्यांचे जन्मस्थळ सिंदखेडराजा येथे विशेष टपाल तिकिटाचे अनावरण, छत्रपती शिवाजी महाराजांनी अफजलखानाच्या वधासाठी वापरलेली वाघनखे लंडन येथील व्हिक्टोरिया अँड अल्बर्ट म्युझियम मधून भारतात आणण्याचा सामंजस्य करार, जम्मू काश्मीर मधील कुपवाडा येथे भारतीय सेनेच्या कॅम्पमध्ये बसविलेला छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारूढ पुतळा, आदी उपक्रम राबविण्यात आले.

शिवशाहीर महाराष्ट्रभूषण बाबासाहेब पुरंदरे यांच्या दिग्दर्शनात 'जाणता राजा' नाट्यकृतीची निर्मिती झाली होती. आतापर्यंत देशात व विदेशात शेकडो प्रयोग झाले आहेत. शिवछत्रपतींच्या पूर्वीचा महाराष्ट्र, महाराष्ट्रामध्ये तत्कालीन परिस्थितीत माजलेली अनागोंदी, शिवरायांचा जन्म, तरुण वयात स्वराज्य स्थापनेची घेतलेली शपथ, प्रशासनावरची जरब, अफजलखानाचा वध, शाहिस्तेखानावर केलेला हल्ला, आग्र्यावरून झालेली सुटका, शिवरायांचा राज्याभिषेक आदी विविध घटनांना उजाळा देणारे प्रसंग यामध्ये जीवंत करण्यात आले आहे. प्रभावी संवाद, भव्य फिरत्या रंगमंचावर २०० पेक्षा अधिक कलाकार व तंत्रज्ञानाच्या मदतीने प्रसंगानुरुप उभे करण्यात आलेले देखावे, विविध परंपरा व लोककलांचे सादरीकरण, घोडे, उंट असा लवाजमा, भव्यदिव्य नेपथ्य, प्रकाशयोजना, संगीत संयोजन व उत्तम संवादफेक प्रेक्षकांना भुरळ पाडणारे होते. तब्बल तीन तास प्रेक्षकांना महानाट्याने खिळवून ठेवले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला शिवाजी प्रतिष्ठानचे अजित आपटे, महानाट्याचे दिग्दर्शक योगेश शिरोळे, नृत्य दिग्दर्शक प्रशांत चव्हाण, शिवाजी महाराजांची भूमिका साकारणारे कलावंत राहुल गांगल व शैलेश गंधारे, जिजाऊ साकारणाऱ्या साक्षी परकाळे तसेच शाहिर महेश आंबेकर यांचा यावेळी ना. मुनगंटीवार यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

# तळोधी (बा) येथे श्रीमद भागवत कथा सप्ताह



**तळोधी (बा) । प्रतिनिधी**

येथील श्रीमद भागवत सप्ताह समितीच्या वतीने महादेव मंदिराचे प्रांगणात, श्रीमद भागवत कथा सप्ताह पार पडला. हभप सुश्री सविताताई जयंतराव खरवडे यांचा श्रीमद् भागवत सप्ताह कथा ज्ञानयज्ञ सप्ताह २६ जानेवारी ते २ फरवरी दरम्यान आयोजित करण्यात आला होता.

यावेळी मोठ्या संख्येने भाविकांची उपस्थिती होती. या मंडळाने प्रवचनासोबतच विषयानुरूप देखावे सादर केले. सोबतच ग्रामस्वच्छता,रोगनिदान शिबीर आदी सामाजिक उपक्रमसुद्धा राबविले. भागवत सप्ताहामुळे सर्वत्र भक्तिमय वातावरण निर्माण झाले.प्रवचनकार ह.भ.प सुश्री सविताताई जयंतराव खरवडे यांनी सात दिवस भागवत केले. त्यांना संगीत मंचात सहकार्याच्या भूमिकेत आर्गन गायक गुड्डुजी बोरकर महाराज, तबला वादक धीरज खेत्रे महाराज, मृदंग वादक आदित्य घुगे महाराज मृदंगाचार्य, गायक कशिनाथ मेश्राम महाराज, सह गायक मनोज बुवा वाटे महारज् यांची साथ लाभली. याशिवाय सात दिवस दररोज,सामुदायीक् ध्यान,तसेच भजन, काकड सायंकाळी हरिपाठ आणि भारुड हे कार्यक्रम पार पडत होते.

# ॲड.अमोल ताराचंद खोब्रागडे यांचा सत्कार

**तळोधी (बा) । प्रतिनिधी**

नागभीड तालुक्यातील नांदेड येथील अरुणभाऊ झाडे विद्यालय तथा कनिष्ठ महाविद्यालय २७ जानेवारी रोजी स्मृतींदिन सोहळ्यात येथील ड.अमोल ताराचंद खोब्रागडे (अधिवक्ता ब्रम्हपुरी) यांचा शाल,श्रीफल व पुष्पगुच्छ देऊन मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून स्वर्गीय नामदेवराव झाडे शैक्षणिक संस्था सुलेझरीचे संस्थापक अरुण झाडे होते.उदघाटक म्हणून सरपंच मुर्लीधर गौरकार होते.प्रमुख मार्गदर्शक म्हणून माजी आमदार अतुल देशकर होते.तर प्रमुख पाहुणे सेवानिवृत्त तहसीलदार अजबराव लालसरे,आरोग्य विस्तार अधिकारी अरुण घाटोळे, अनिल झाडे नागपूर,नंदू झाडे नागपूर,संस्था सचिव कल्पना घटोळे,महाविद्यालयाचे प्राचार्य अरविंद राऊत,पोलीस पाटील शीतल इचकापे यांची वलनीचे माजी सरपंच व विद्यमान सदस्य होमदेव मेश्राम,



माजी सरपंच श्याम आत्राम आदींची उपस्थिती होती.यावेळी सुशिलाबाई नामदेवराव झाडे यांचा २० वा स्मृतिदिन सोहळा साजरा करण्यात आला.या सोहळ्याचे औचित्य साधून माजी विद्यार्थी ड.अमोल ताराचंद खोब्रागडे (अधिवक्ता ब्रम्हपुरी)यांचा मानवरांच्या हस्ते शाल,श्रीफळ, ग्रामगीता व पुष्प रोपटे देऊन सत्कार करण्यात आला. सूत्रसंचालन प्रा.सुभाष बोरकर यांनी केले तर आभार सहाय्यक शिक्षक सुरेश कंकलवार यांनी मानले.



**भिसी रोड शंकरपूर येथे फुलांनी भरलेले आम्र वृक्ष प्रवाशांना आकर्षित करीत आहे.(छाया चिमूर प्रतिनिधी शेषराव राऊत)**

# उदारामजी हवेलीकर कृतज्ञता सोहळा

**गेली ९४ वर्षे सामाजिक व व्यावसायिक क्षेत्रात सतत कार्यरत असणारे व्यक्तीत्त्व म्हणजे भद्रावती येथील श्री.उदारामजी रामचंद्रजी हवेलीकर यांच्या प्रदीर्घ कार्याविषयी व व्रतस्थ जीवनाविषयी कृतज्ञता व्यक्त करण्याकरिता संपन्न झालेला भव्य अमृत सोहळा उपस्थितांसाठी प्रेरणादायी ठरला. हा सोहळा म्हणजे ज्येष्ठांविषयी व्यक्त केलेला आदरभाव व त्यांच्या त्यागाप्रती व्यक्त झालेल्या समर्पित भावना होय.**




डॉ.यशवंत घुमे
मो.९८२२२३३९१२
e sahyandrinews@gmail.com



काल आमचे मित्र तथा भद्रावती येथील यशस्वी व प्रसिद्ध व्यावसायिक श्री.धर्मेंद्र हवेलीकर यांचे वडील श्री. उदारामजी रामचंद्रजी हवेलीकर यांच्या ९४ व्या वाढदिवसाच्या निमित्ताने उपस्थित राहण्याची संधी मिळाली. भद्रावती येथील जे.के. सिटी पॅलेस फार्म येथे संपन्न झालेला नयनमनोहर सोहळा त्यांच्या कुटुंबीयांसह भद्रावतीकरांनी अनुभवला. सामाजिक व व्यावसायिक क्षेत्रात कार्यरत असणारे श्री. धर्मेंद्र यांचे वडील श्री. उदारामजी हवेलीकर आणि त्यांच्या आई सौ. सुमित्राबाई उभयतांच्या प्रदीर्घ कार्याविषयी, त्यांच्या समर्पित जीवनाविषयी कृतज्ञता व्यक्त करण्याकरिता हवेलीकर भावंडांच्यावतीने भव्य अमृत महोत्सव सोहळा थाटात आयोजित करण्यात आला होता. नयनरम्य कार्यक्रम स्थळी आकाशात केलेली रंगीबेरंगी आतषबाजी सगळ्यांचे लक्ष वेधून घेत होती. समोरील डिस्प्लेवर उदारामजींचे कर्तृत्व व व्यक्तित्व चित्ररूपात दाखविले जात होते. या सोहळ्याला भद्रावती शहरातील तथा परिसरातील अनेक ज्येष्ठ आणि श्रेष्ठ नागरिकांनी उपस्थिती लावली होती. या कार्यक्रमाचे आणखी एक वैशिष्ट्ये म्हणजे वडिलांच्या या अमृत महोत्सवी सोहळ्याच्या निमित्ताने हवेलीकर बंधूंनी भद्रावती शहरातील तसेच परिसरातील काही ज्येष्ठ नागरिकांचा सत्कार व गौरव केला. त्यांना सन्मानित केले. अलीकडे वाढदिवस बरेच होत असतात. जणू काही वाढदिवस करणे म्हणजे फॅशन झाली आहे. परंतु उदारामजी हवेलीकर यांचा वाढदिवस मला फार महत्त्वाचा वाटतो.याचे कारण अलीकडे विभक्त कुटुंब पद्धती आहे. व्यवसाय तथा नोकरीमुळे अनेकांना घरदार सोडून बाहेर राहावे लागते. परंतु हवेलीकर चारही भावंडांनी एकत्र कुटुंब पद्धतीत राहुन पूर्ण परिवाराचा विकास केला आहे. अलीकडे एकत्र कुटुंब पद्धती दुर्मिळ होत चालली आहे. मुलाची लग्न झाली, ती थोडी सुजाण झाली, नोकरी धंद्याला लागली की विवाहानंतर विभक्त राहणे पसंत करतात. परंतु ह्या परिवाराचे वैशिष्ट्ये म्हणजे काळाच्या कसोटीत हा परिवार एकत्र मूठ बांधल्यासारखा टिकून आहे. चारही भावंडांचे कौटुंबिक दायित्व, कुटुंबीयांचे मिळते जुळते विचार, सामंजस्य त्यातून कुटुंबाची झालेली भरभराट, प्रगती यामुळे हा परिवार इतरांसाठी आदर्शवत ठरला आहे. हवेलीकर बंधूंनी आपल्या वडिलांच्या प्रति कृतज्ञता व आदर व्यक्त करण्यासाठी भव्य अभिष्टचिंतन, संगीत रजनी, कौटुंबिक स्नेहमिलन आयोजित करून कुटुंबात ज्येष्ठांचा आदर केला पाहिजे. त्यांच्या कर्तुत्वाचा सन्मान केला पाहिजे हे या कार्यक्रमातून दाखवून दिले. समाजात अलीकडे ज्येष्ठांची होणारी कुचंबणा व वाढत्या वृद्धाश्रमांची संख्या लक्षात घेता हा सोहळा उपस्थितांसाठी निश्चितच प्रेरणादायी ठरला. या सोहळ्यास हवेलीकर परिवाराचे आप्तेष्ट व मित्रमंडळीनी उपस्थित राहून प्रेरणा घेत उत्साह वाढविला. उदारामजी हवेलीकर हे मूळचे नागपूर जवळील उमरेड या गावचे रहिवासी होते. तिथे खादी उद्योगात काही काळ त्यांनी नोकरी केली. पुढे जवळपास १९६७ या वर्षी त्यांची भद्रावती येथील खादी उद्योगात बदली झाली. भद्रावती येथे नोकरी सुरू असताना त्यांना नाशिक येथे बदलीवर जाण्यास सांगण्यात आले.परंतु उदारामजींची नाळ भद्रावती शहराशी जुळल्यामुळे त्यांना भद्रावती हे गाव सोडायचे नव्हते. त्यांनी भद्रावती येथेच स्थायिक होण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे त्यांनी नाशिक येथील बदलीवर जाण्यास नकार दिला. परिणामत: त्यांना ती नोकरी सोडावी लागली. पुढे कुटुंबाचा गाडा चालवण्यासाठी त्यांनी भद्रावती शहरांत स्वतःचा स्वतंत्र खादी व्यवसाय सुरू केला. परंतु या व्यवसायात फारसे यश आले नाही. घरची आर्थिक परिस्थिती डबघाईस आली. तरीही न डगमगता त्यांनी अपार कष्ट व आत्मविश्वास या गुणांच्या जोरावर आपल्या संसाराचा गाडा सुरळीतपणे चालविला. दरम्यानच्या कालावधीमध्ये त्यांचा मोठा मुलगा धर्मेंद्र हा व्यवसायात उतरला. कठोर परिश्रम व प्रबळ इच्छाशक्तीच्या भरोशावर आपल्या कर्तृत्वाने वडिलांचे व्यवसाय क्षेत्रातील स्वप्न पूर्ण करण्याचा संकल्प केला. त्यांनी सुरुवातील आहुजा नामक व्यावसायिकाकडे नोकर राहून तेथून व्यावसायिक कौशल्याचे बाळकडू प्राप्त केले. कठोर परिश्रम व प्रचंड मेहनत करून वडिलांच्या खांद्याला खांदा लावून भद्रावती शहरात यशस्वी व्यवसायिक म्हणून स्थान निर्माण केले आहे. वडीलांच्या मार्गदर्शनात ही चारही भावंडे एकत्रितपणे राहून प्रगतीकडे वाटचाल करीत आहे. वडिलांचे मार्गदर्शन व आदर्श समोर ठेवून त्यांची व्यवसायाकडे घोडदौड सुरू आहे. आज हवेलीकर परिवाराने भद्रावती शहरात नामांकित व्यापारी म्हणून लौकिक प्राप्त केला आहे. प्रगती करायची असेल तर विभक्त कुटुंब पद्धतीपेक्षा एकत्र कुटुंब पद्धती कधीही चांगली हे त्यांनी स्वतःच्या आचरणातून सिध्द केले आहे. एकत्र राहून एकमेकांच्या सुखदु:खात सहभागी होता येते व कमी खर्चात कुटुबाचा गाडा चालविता येतो. जसे विभक्त कुटुंब पद्धतीमध्ये मानसिक ताणतणाव असतात तसे तसेच संयुक्त कुटुंब पद्धतीमध्येसुध्दा असले तरी सगळेजण एकमेकांना सांभाळून घेतात. त्यामुळे एकट्यावर दबाव येत नाही. हा संयुक्त कुटुंब पद्धतीचा मोठा फायदा आहे. गुण्यागोविंदाने एकत्र राहणारा हवेलीकर परिवार हा भद्रावतीकरांसाठी निश्चितच अभिमानास्पद आहे. वडीलांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने श्री. धर्मेंद्र, श्री. जितेंद्र, श्री. राजेंद्र, श्री. रवींद्र आणि समस्त हवेलीकर परिवाराने वडिलांचा भव्य अमृत महोत्सव साजरा करून मुलांनी जेष्ठांचा कसा मानसन्मान करावा, त्यांच्या भावनांची कशी जोपासना करावी, त्यांच्या कर्तृत्वातून जीवनाला कशी दिशा द्यावी अशा विविध पैलूंनी समाजाला एक प्रकारचे मार्गदर्शन दिले आहे. त्यांनी वडिलांकडून घेतलेल्या संस्काराच्या शिदोरीवर या परिवाराची प्रगतीकडे घोडदौड सुरू आहे. श्री. उदारामजींनी आयुष्यभर केलेला संघर्ष हा व्यवसाय क्षेत्रामध्ये नव्याने उतरू पाहण्यासाठी निश्चितच प्रेरणादायी आहे. वाढदिवस हे होत असले तरी हा कार्यक्रम ज्येष्ठांप्रति सन्मान व्यक्त करणारा होता. आदरभाव व्यक्त करणारा होता. नव्या पिढीला नवी आशा,नवी दिशा देणारा होता. ज्येष्ठाप्रति आदरभाव व्यक्त करणारा व भारतीय संस्कृतीचे जतन व संवर्धन करणारा ठरला.

# पॅरिसच्या कर्करोगविषयक सनदेला मान्यता!

**आपण डॉक्टर वगैरे काही नसलो तरी समाजाला काहीतरी देणेकरी लागतो, म्हणूनच हा छोटा–सा खारीचा वाटा. कर्करोगाविषयी जनजागृती करण्याकरिता ४ फेब्रुवारी हा दिवस जागतिक कर्करोग दिवस म्हणून साजरा केला जातो. कर्करोगाबाबत माहितीचा प्रसार करणे आणि कर्करोग प्रतिबंधात्मक उपाययोजनांना प्रोत्साहन देणे हे जागतिक कर्करोग दिवस साजरा करण्यामागील उद्दिष्ट आहे. पॅरिस येथे सन २००० मध्ये झालेल्या जागतिक परिषदेत कर्करोगविषयक मसुदा मांडण्यात आला. अशा प्रकारचा विषय हाताळणारी ही पहिलीच परिषद ठरली. या परिषदेत जगभरातील शासकीय उच्चपदस्थ अधिकारी आणि कर्करोगविषयक संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित होते. सदर बोधप्रद संकलित लेख श्रीकृष्णकुमार लक्ष्मी–गोविंदा निकोडे गुरूजींच्या शब्दांतून जरुर वाचा... संपादक.**



जागतिक कर्करोग दिन हा दि.४ फेब्रुवारी रोजी कर्करोगाविषयी जागरुकता वाढवण्यासाठी आणि त्याचे प्रतिबंध, शोध आणि उपचारांना प्रोत्साहन देण्यासाठी आंतरराष्ट्रीय दिवस आहे. जागतिक कर्करोग दिन सन २००८ मध्ये लिहिलेल्या जागतिक कर्करोग घोषणेच्या उद्दिष्टांना पाठिंबा देण्यासाठी युनियन फॉर इंटरनॅशनल कॅन्सर कंट्रोलच्या नेतृत्वात आहे. जागतिक कर्करोग दिनाचे प्राथमिक उद्दिष्ट कर्करोगामुळे होणारे आजार आणि मृत्यू लक्षणीयरीत्या कमी करणे, हे आहे आणि कॅन्सरपासून बचाव करता येणाऱ्या पीडितांवर होणारा अन्याय दूर करण्यासाठी आंतरराष्ट्रीय समुदायाला एकत्र आणण्याची ही एक संधी आहे. हा दिवस संयुक्त राष्ट्रसंघाद्वारे पाळला जातो. जागतिक कर्करोग दिन चुकीच्या माहितीला लक्ष्य करतो, जागरूकता वाढवतो आणि कलंक कमी करतो. जागतिक कर्करोग दिनानिमित्त कर्करोगाने प्रभावित झालेल्यांना पाठिंबा दर्शवण्यासाठी अनेक उपक्रम राबवले जातात. यापैकी एक चळवळ आहे नो हेअर सेल्फी, कर्करोगावर उपचार घेत असलेल्यांसाठी धैर्याचे प्रतीक दर्शविण्यासाठी केशकर्तनकर्त्यांनी त्यांचे डोके शारीरिक किंवा अक्षरशः मुंडन करण्याची जागतिक चळवळ आहे. सहभागींच्या प्रतिमा नंतर सर्व सोशल मीडियावर शेअर केल्या जातात. जगभरात शेकडो कार्यक्रमही होतात.

जागतिक कर्करोग दिनाची स्थापना दि.४ फेब्रुवारी २००० रोजी पॅरिस येथे झालेल्या न्यू मिलेनियमसाठी कर्करोग विरुद्धच्या जागतिक कर्करोग शिखर परिषदेत करण्यात आली. पॅरिस अगेन्स्ट कॅन्सरची सनद, जी संशोधनाला चालना देण्यासाठी, कर्करोग रोखण्यासाठी, रूग्ण सेवा सुधारण्यासाठी तयार करण्यात आली होती, त्यामध्ये दस्तऐवजाच्या अधिकृत स्वाक्षरीची वर्धापनदिन जागतिक कर्करोग दिन म्हणून स्थापित करणारा लेख देखील समाविष्ट होता, त्यावर तत्कालीन जनरल यांनी समिटमध्ये स्वाक्षरी केली होती. कर्करोगाविषयी जनजागृती करण्याकरिता ४ फेब्रुवारी हा दिवस जागतिक कर्करोग दिवस म्हणून साजरा केला जातो. कर्करोगाबाबत माहितीचा प्रसार करणे आणि कर्करोग प्रतिबंधात्मक उपाययोजनांना प्रोत्साहन देणे हे जागतिक कर्करोग दिवस साजरा करण्यामागील उद्दिष्ट आहे. पॅरिस येथे सन २०००मध्ये झालेल्या जागतिक परिषदेत कर्करोगविषयक मसुदा मांडण्यात आला. अशा प्रकारचा विषय हाताळणारी ही पहिलीच परिषद ठरली. या परिषदेत जगभरातील शासकीय उच्चपदस्थ अधिकारी आणि कर्करोगविषयक संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित होते. त्यांनी पॅरिसच्या कर्करोगविषयक सनदेला मान्यता दिली. प्रस्तुत सनद कर्करोगसंबंधित संशोधन आणि प्रतिबंधात्मक उपाययोजना याकरिता आर्थिक गुंतवणूक करणे, कर्करोगग्रस्त रूग्णांचे जीवनमूल्य उंचावणे तसेच त्यांना योग्य उपचार देणे अशा तत्त्वांचा पुरस्कार करते. सनदेच्या दहाव्या कलमात अधिकृतरीत्या ४ फेब्रुवारी हा दिवस जागतिक कर्करोग दिवस म्हणून जाहीर केला गेला. कर्करोगविषयक उपलब्ध माहिती तसेच कर्करोगाचे निदान आणि उपचार यांत झालेली लक्षणीय प्रगती यांमुळे रोगप्रसारामध्ये कपात होणे अपेक्षित आहे. परंतु जागतिक आकडेवारीनुसार दरवर्षी कर्करोगाचे नव्याने निदान होणाऱ्या रूग्णांच्या संख्येत भर पडत आहे. जागतिक आरोग्य संघटनेच्या मते, कर्करोगाच्या माहितीचा प्रसार करून कर्करोगाने होणाऱ्या मृत्यूचे प्रमाण कमी करता येऊ शकते. यासाठी कर्करोग प्रतिबंधात्मक उपायांविषयी जागरूकता वाढविण्याच्या उद्देशाने जगभरातील कर्करोग संस्था आणि आरोग्य संघटना जागतिक कर्करोग दिवस साजरा करतात. कर्करोगामुळे होणाऱ्या मृत्यूंपैकी सुमारे ७० टक्के मृत्यू हे अल्पविकसित देशांमध्ये होत असल्याकारणाने अशा ठिकाणी कर्करोग आणि त्याचा प्रतिबंध याबद्दल जनजागृती करण्यासाठी जागतिक कर्करोग दिवस हे एक महत्त्वाचे साधन आहे. आंतरराष्ट्रीय कर्करोग नियंत्रण संघटना– युनियन फॉर इंटरनॅशनल कॅन्सर कंट्रोल–यूआईसीसी ही संस्था आंतरराष्ट्रीय पातळीवर कर्करोगावर नियंत्रण राखण्यासाठी आणि पर्यायाने जागतिक आरोग्य सुधारण्यासाठी कार्यशील असते. आंतरराष्ट्रीय कर्करोग नियंत्रण संघटना, जागतिक आरोग्य संघटना आणि इतर आंतरराष्ट्रीय संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक कर्करोग दिवसाचे आयोजन केले जाते. प्रत्येक वर्षी आंतरराष्ट्रीय कर्करोग नियंत्रण संघटना जागतिक कर्करोग दिवसानिमित्त कर्करोगाशी निगडित रूपरेखा– थीम्स जाहीर करते. या रूपरेखेला अनुसरून विविध आरोग्य संस्था आणि कर्करोग उपचार केंद्र यांद्वारे शैक्षणिक उपक्रम राबवले जातात. या संस्थांद्वारे त्यांच्या संकेतस्थळांवर कर्करोगाविषयी माहिती प्रसारित केली जाते. आंतरराष्ट्रीय कर्करोग नियंत्रण संघटना स्थानिक आरोग्य संस्थांच्या साहाय्याने संमेलने, व्याख्याने, प्रदर्शने तसेच निधी उभारणी कार्यक्रम यांचे आयोजन केले जाते. काही देशांमध्ये आकाशवाणी आणि दूरदर्शन या माध्यमांद्वारे ४ फेब्रुवारी किंवा त्या आठवड्यात कर्करोगविषयक विशेष कार्यक्रम प्रसारित केले जातात.जागतिक कर्करोग दिवसानिमित्त सामूहिक आणि वैयक्तिक प्रयत्नांतून कर्करोगाचा जनजीवनावरील परिणाम कमी करता येऊ शकतो, या आशयाशी संलग्न रूपरेखा आखण्यात आली. तसेच कर्करोगाबाबत गैरसमज दूर करणे; कर्करोग हा प्रतिबंधात्मक आजार आहे; कर्करोगाविषयी वैयक्तिक बांधीलकी, अशा विविध विषयांना अनुसरून देखील रूपरेखा योजण्यात येतात. भारतामध्ये सन २०१४ पासून ७ नोव्हेंबर यादिवशी राष्ट्रीय कर्करोग जनजागृती दिवस साजरा करण्यात येतो.

**संकलन व सुलेखन**
**श्री कृष्णकुमार लक्ष्मी–गोविंदा निकोडे गुरूजी.**
**रामनगर वॉर्ड, गडचिरोली.**
**फक्त दूरध्वनी– ७१३२७९६६८३.**

# उल्हासनगर गोळीबार प्रकरण:भाजप आमदार गणपत गायकवाडसह तिघांना १४ फेब्रुवारीपर्यंत पोलिस कोठडी



**मुंबई–**भाजप आमदार गणपत गायकवाड यांनी उल्हासनगर पोलिस ठाण्यात केलेल्या गोळीबारामुळे एकच खळबळ माजली आहे. या गोळीबारात शिंदे सेनेचे माजी नगरसेवक महेश गायकवाड हे गंभीर जखमी झालेत. त्यांच्यावर ज्युपिटर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. दुसरीकडे पोलिसांनी आमदार गणपत गायकवाड यांच्यासह तिघांना अटक केली असून त्यांना कोर्टासमोर सादर केले आहे. याप्रकरणी कोर्टाने तिघांना ११ दिवसांची पोलिस कोठडी सुनावली आहे. त्यामुळे १४ फेब्रुवारीपर्यंत या तिघांची पोलिस कोठडीत चौकशी होणार आहे.न्यायाधीश ए.ए निकम यांच्या बेंचसमोर ही सुनावणी घेण्यात आली. गणपत गायकवाड यांनी गोळीबार केला असल्याची माहिती यावेळी पोलिसांनी कोर्टात दिली. त्यानंतर गणपत गायकवाड यांची बंदूक पोलिसांकडून जप्त करण्यात आली. तसेच या प्रकरणात आम्हाला सखोल चौकशी करायची असून फरार आरोपींचा देखील आम्हाला शोध घ्यायचा आहे, असंही पोलिसांनी कोर्टात सांगितलं. पोलिसांनी १४ दिवसांची पोलीस कोठडी द्यावी अशी मागणी पोलिसांनी केली, त्यानंतर कोर्टाने त्यांचा निकाल हा राखून ठेवला होता. पण आता गणपत गायकवाड यांना १४ दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली होती.हिललाईन पोलीस स्टेशनमध्ये आमदार गणपत गायकवाड महेश गायकवाड आणि राहुल पाटील यांच्यासह इतरांसोबत होते. या दोन्ही गटात आधी बसून सुरू असलेल्या चर्चेत अचानक वातावरण तापलं आणि आमदार गणपत गायकवाड यांनी थेट पिस्तुल काढून गोळीबाराला सुरूवात केली. महेश गायकवाड आणि राहुल पाटील यांना या गोळीबारात गोळ्या लागल्या. गोळीबाराचा आवाज ऐकल्यावर तातडीने एका पोलिसाने आत धाव घेतली. मात्र तोवर आमदार गायकवाड हे महेश गायकवाडला मारहाण करत होते. त्यांना रोखण्याचा पोलीस कर्मचाऱ्याने प्रयत्न केला. त्याचवेळी दोन्ही गटांच्या कार्यकर्त्यांनीही आत धाव घेतली. दोन्ही कार्यकर्त्यांची एकमेकांशी तुंबळ हाणामारी झाली. एकमेकांवर खुर्च्या उचलून कार्यकर्त्यांची हाणामारी झाली.सुरक्षेच्या कारणाने व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे आमदार गायकवाड व त्यांच्या साथीदारांना न्यायालयात सादर केले जावे, अशी मागणी पोलिसांनी केली होती. परंतु, कोर्टाने त्यांची मागणी मान्य केली नाही. अखेर त्यांना कोर्टात सादर करावे लागले. पोलिसांकडून १५ दिवसांची पोलिस कोठडी मागितली जात आहे. तर त्यांना कमीत कमी पोलिस कोठडी दिली जावी, अशी मागणी आरोपींच्या वकीलांकडून केली जात आहे. या १४ फेब्रुवारी पर्यंत पोलिस कोठडीमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ठाण्यातील ज्युपिटर हॉस्पिटलमध्ये जाऊन कल्याण पूर्व विभागातील माजी नगरसेवक महेश गायकवाड यांच्या प्रकृतीची विचारपूस केली. यावेळी काल घडलेल्या घटनेची त्यांनी पोलिसांकडून सविस्तर माहिती जाणून घेतली तसेच गायकवाड यांच्यावर सुरू असलेल्या उपचारांबद्दल डॉक्टरांशी चर्चा केली. झालेली घटना ही अत्यंत दुर्दैवी असून या घटनेतून बचावलेल्या गायकवाड यांनी लवकरात लवकर पूर्ण बरे व्हावे अशी भावना मुख्यमंत्री शिंदे यांनी यावेळी व्यक्त केली.या घटनेनंतर विरोधकांनी राज्य सरकारवर टीकेची झोड उठवली. त्यांनी राज्यात कायदा – सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्याचा आरोप केला. त्यानंतर या प्रकरणात गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रकरणाच्या चौकशीसाठी एसआयटी स्थापन करण्याची घोषणा केली. एसीपी निलेश सोनवणे यांच्या नेतृत्वात ही एसआयटी या प्रकरणाचा तपास करेल.या गोळीबारामध्ये गंभीर जखमी झालेल्या महेश गायकवाड यांना ठाण्यातल्या ज्युपिटर रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. महेश गायकवाड यांच्या शरीरातून ६ गोळ्या बाहेर काढण्यात आल्या. पण त्यांच्या प्रकृतीला असणारा धोका अद्याप टळला नाही. त्यांची प्रकृती चिंताजनक आहे. त्यांना व्हेंटिलेटरवर ठेवण्यात आले आहे. महेश गायकवाड यांच्यासोबत असणारे राहुल पाटील हे सुद्धा गोळीबारात जखमी झालेत. डॉक्टरांनी त्यांच्या शरीरातूनही २ गोळ्या बाहेर काढल्या आहेत.या गोळीबारानंतर उल्हासनगर येथील हिल लाईन पोलिसांनी गोळीबार व हत्येचा प्रयत्न करण्याचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी आमदार गणपत गायकवाड, हर्षल केणे, संदीप सर्वांकर यांना पोलिसांनी अटक केली. त्यांना त्यांना कळवा येथील पोलिस ठाण्यात ठेवण्यात आले. त्यानंतर सायंकाळी त्यांना न्यायालयात हलवण्यात आले. या प्रकरणी आणखी ३ आरोपी फरार असून, पोलिस त्यांचा कसून शोध घेत आहेत.दरम्यान, दुसरी बाब म्हणजे, कोणी काय केले. कसे घडले याबाबत विचारण्यात काहीही अर्थ नाही. जे काही आहे ते लोकांसमोर आलेले आहे. सीसीटीव्हीच्या माध्यमातून जनतेला सर्व कळालेले आहे. त्यामुळे पोलिसाकडून चौकशी करत आहेत. यावर जास्त बोलण्यासारखे काहीच नाही. कोण काय म्हणते, त्यात काही म्हणण्यासारखे नाही. जे कोणी यात जबाबदार असतील त्यांच्यावर पोलिसांकडून कारवाई होईल, अशी अपेक्षा आम्हाला पोलिसांकडून आहे.दुसरीकडे, गणपत पाटील यांनी आपण आत्मसंरक्षणार्थ गोळीबार केल्याचा दावा केला आहे. मी १० वर्षापूर्वी एक भूखंड घेतला होता. शिंदे गटाच्या महेश गायकवाड यांनी जबरदस्ती संबंधित जागेवर ताबा मिळवण्याचा प्रयत्न केला. ते कम्पाऊंड तोडून जागेचा ताबा घेण्याचा प्रयत्न करत होता, असे गणपत गायकवाड यांनी म्हटले आहे. काल सायंकाळी महेश गायकवाड पोलिस स्टेशनमध्ये आले. माझा मुलगा पोलिस स्टेशनमधून बाहेर जात असताना त्यांनी त्याला धक्काबुक्की केली. हा प्रकार मला सहन झाला नाही. माझ्यासमोर ते माझ्या मुलाला मारत असतील, तर माझा जगून काय फायदा? त्यामुळे काल रात्री मी आत्मसंरक्षणासाठी गोळीबार केला, असे ते म्हणाले.

सह्याद्रीचा राखणदार



# आ.सुरेश धस यांच्या वाढदिवसा निमित्त पाटोदा न.पं.कडुन दिव्यांग बंधु भगिनींना ड्रेस व साडी वाटप

## जयदत्त भैय्या धस यांच्याकडुन या स्तुत्य उपक्रमाचे कौतुक










**पाटोदा । प्रतिनिधी**

माजी मंत्री तथा विधान परिषद सदस्य आमदार सुरेश आण्णा धस यांच्या वाढदिवसा निमित्त विविध सामाजिक उपक्रमाअंतर्गत दिव्यांग बांधवांना ड्रेस वाटप, दिव्यांग भगिनींना साडी वाटप, दिव्यांग विद्यार्थ्यांना स्कूल बॅग(दप्तर)चे वाटप करण्यात आले. तसेच भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते, या वेळी ४५ रक्तदात्यांनी रक्तदान केले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी युवा नेते जयदत्त भैय्या धस होते. तर व्यासपीठावर नगराध्यक्षा सौ.दिपालीताई राजूभैय्या जाधव,माजी जिल्हा परिषद सभापती महेंद्र गर्जे, पंचायत समिती सभापती केशव रसाळ, रिपब्लिकन पक्षाचे तालुकाध्यक्ष डॉ.नरेंद्र जावळे, अँड.जब्बार पठाण यांची उपस्थिती होती. या वेळी बोलताना युवा नेते जयदत्त भैय्या धस म्हणाले की काही दिवसापूर्वी आण्णांनी आपल्या मनातली भावना व्यक्त केली होती की माझा वाढदिवस सामाजिक उपक्रमांने व वंचित घटका सोबत साजरा करण्यात यावा. आणि आण्णांनी सांगितल्या प्रमाणे व इच्छे प्रमाणे पाटोदा नगर पंचायतने सामाजिक उपक्रमा अंतर्गत दिव्यांग बांधवांना ड्रेस, दिव्यांग भगिनींना साड्या व दिव्यांग विद्यार्थी यांना स्कूल बॅग(दप्तर)चे वाटप करून व भव्य असे रक्तदान शिबीर आयोजित करून वाढदिवस साजरा केला. आणि या वेळी ४५ रक्तदात्यांनी रक्तदान केले. हे पाटोदा नगर पंचायतच्या नगराध्यक्षा, उपनगराध्यक्ष, सभापती व नगरसेवक यांनी केलेले हे आयोजन खरच कौतुकास्पद व अभिनंदनीय आहे. कारण की दिव्यांग घटक हा आपल्या समाजातील अतिशय महत्त्वाचा व वचिंत घटक आहे. आणि आपण त्या दिव्यांग बांधवांना डोळ्यासमोर ठेवून जो सामाजिक उपक्रम व भव्य रक्तदान शिबिर आयोजित केले आहे ते खरोखरच कौतुकास्पद व अभिनंदनीय आहे. आणि आपण सर्वांना माहीती आहे की काही दिवसापुर्वी देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी साहेब व केंद्र सरकारच्या वतीने आपण बीड जिल्ह्याच्या खासदार डॉ.प्रितमताई मुंडे यांच्या नेतृत्वाखाली दिव्यांग बांधवांसाठी शिबिराचे आयोजन केले होते. आणि त्यांना उपयोगी साहित्याचे वाटप करण्यात आले होते. पाटोदा नगर पंचायत तर्फे हे चांगले सामाजिक उपक्रम घेण्यात आले आहेत. याचे अनुकरण बाकी सर्वांनी करावे असे आवाहन या वेळी केले.

या वेळी कार्यक्रमास नगर पंचायतचे गटनेते बळीराम पोटे, उपनगराध्यक्ष शरद बामदळे, आमदार सुरेश धस यांचे स्वीय सहाय्यक तथा पाटोदा तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष सोमिनाथ कोल्हे, माजी उपनगराध्यक्ष तथा नगरसेवक नय्युम भाई पठाण, माजी सभापती राजूभैय्या जाधव, सभापती श्रीहरी गिते पाटील, सभापती रामेश्वर गोरे, सभापती हनूमंत काळे, सभापती किशोर आडागळे नगरसेवक रोहीदास गिते, नगरसेवक संतोष दादा जाधव, नगरसेवक असिफ सौदागर, नगरसेवक आदम सय्यद, नगरसेवक महादेव जाधव, नगरसेवक सुनील वाघमारे, नगरसेवक सुशिल कोठेकर, नगरसेवक सतीश घोलप, सरपंच किशोर नागरगोजे, मा.नगराध्यक्ष गणेश नारायणकर, जितेंद्र भोसले, प्रविण जाधव, अंगद सांगळे, जितेंद्र सांगळे, दिनेश नारायणकर, जिलानी शेख,अशोक दगडखैर, चेतन जावळे, अरविंद सरवदे,सुभाष पाखरे, संदीप दादा जाधव, कार्यकर्ते, पदाधिकारी, दिव्यांग बंधु भगिनी व दिव्यांग विद्यार्थी यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. या वेळी कार्यक्रमाचे प्रास्ताविक गटनेते बळीराम पोटे यांनी तर बहारदार सुत्रसंचलन योगेश ठोसर यांनी केले. तर आभार उपनगराध्यक्ष शरद बामदळे यांनी मानले.

## उजनी उणे सात टक्के! उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर महापालिकेची दुबार पंपिंगची तयारी; १.०४ कोटींचा होणार खर्च



**सोलापूर :** उजनी धरणातून सध्या शेतीसाठी पाणी सोडण्यात आले असून ते १५ फेब्रुवारीपासून सुरू असणार आहे. सध्या उजनीतील पाणीसाठा उणे सात टक्के असून फेब्रुवारीअखेर धरण उणे ३० टक्के होईल. त्यावेळी सोलापूर शहराला जलवाहिनीद्वारे पाणी घेण्यासाठी दुबार पंपिंग करावे लागणार असून त्याची तयारी महापालिकेने सुरू केली आहे. दुबार पंपिंगसाठी तब्बल एक कोटी चार लाख रुपयांचा खर्च अपेक्षित असून त्याच्या निविदेची तयारी सुरू आहे.यंदाच्या पावसाळ्यात जिल्ह्याची वरदायिनी उजनी केवळ ६६ टक्केच भरले. सरासरीपेक्षा कमी पाऊस झाल्याने जिल्ह्यातील माळशिरस, सांगोला, माढा, करमाळा व बार्शी या पाच तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर झाला आहे. दुसरीकडे उर्वरित तालुक्यांमध्येही दुष्काळसदृश स्थिती आहे. उजनीमुळे जिल्ह्यातील दोन लाख हेक्टर जमीन सिंचनाखाली आली आहे. पण, कडक उन्हाळा सुरू होण्यापूर्वीच उजनीने तळ गाठला आहे. त्यामुळे आता १५ फेब्रुवारीपासून धरणातील पाणी केवळ पिण्यासाठीच राखून ठेवले जाणार आहे.पुढच्या पावसाळ्यापर्यंत उजनीतून सोलापूर शहरासाठी नदीद्वारे दोन ते तीनवेळा पाणी सोडावे लागणार आहे. दुसरीकडे सध्याच्या जुन्या जलवाहिनीतून देखील दररोज पाणी उपसा केला जातो. मात्र, धरण उणे ३० टक्के झाल्यावर महापालिकेला दुबार पंपिंग करावे लागते. त्यासाठी एक कोटींहून अधिक रुपयांचा खर्च करावा लागतो. तर पाणी पातळी उणे ५० टक्क्यांवर गेल्यास तिबार पंपिंग देखील करण्याची वेळ यंदा येणार आहे. त्यासाठी देखील दोन ते अडीच कोटींचा खर्च अपेक्षित आहे. शेतीला आता पाणी सोडले जाणार नसल्याने शेतकऱ्यांचीही विशेषत: फळ बागायतदारांची चिंता वाढणार आहे.सोलापूर शहराच्या पाणीपुरवठ्यासाठी समांतर जलवाहिनी टाकली जात आहे. टेंभुर्णी बायपासजवळून जलवाहिनी जाणार आहे, पण त्याला ग्रामपंचायतीने विरोध केला असून तसा ठराव देखील करण्यात आला आहे. महापालिका अधिकाऱ्यांनी हा विषय जिल्हाधिकाऱ्यांसमोर मांडला. ती जागा राष्ट्रीय महामार्ग विकास प्राधिकरणाची असल्याने थांबलेले तीन किलोमीटरचे काम लवकरच सुरू केले जाईल, अशी माहिती महापालिकेच्या अधिकाऱ्यांनी 'सकाळ'शी बोलताना दिली. जागा स्वत:ची नसतानाही लोकहिताचे काम अडविल्याप्रकरणी ग्रामपंचायतीवर कारवाई होवू शकते, असेही अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे.

## महापालिकेच्या ड्रेनेज विभागाचे आधुनिकीकरण

**सोलापूर :** महापालिकेच्या सार्वजनिक आरोग्य विभागाकडील ड्रेनेज विभाग आता अत्याधुनिक होत आहे. महापालिकेने नवीन ८ डिसेल्टींग मशीन खरेदी केल्या आहेत. या मशीनमुळे आता कर्मचाऱ्यांचे मॅनहोलमध्ये उतरून धोकादायक काम टळणार आहे.

सोलापूर महापालिका आयुक्त शीतल तेली - उगले यांच्या आदेशानुसार अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे यांच्या मार्गदर्शनाखाली यांत्रिक विभागाच्या वतीने ड्रेनेज विभागाचे सक्षमीकरण करण्यात येत आहे.या अंतर्गतच महापालिकेच्या सार्वजनिक आरोग्य अभियंता विभागातील ड्रेनेज विभागाच्या ताफ्यात आता नवीन ८ मशीन दाखल झाल्या आहेत. यापूर्वी दोन अशा मशीन महापालिकेने खरेदी केल्या होत्या. त्या जुन्या झाल्या आहेत.

त्यात आता या नवीन आठ मशीनची भर पडली आहे. यामुळे आता प्रत्येक झोन कार्यालयाला एक मशीन उपलब्ध होणार आहे. ड्रेनेज लाईन मॅनहोलमधील मलबा काढणे आता सोपे झाले आहे.या एका मशीनची किंमत




११ लाख ८० हजार रुपये आहे. टाटा एस गोल्ड कंपनीची ही मशीन आहे. १४ व १५ व्या वित्त आयोगाच्या निधीतून या मशीन खरेदी करण्यात आल्या आहेत. शासनाच्या जीईएम पोर्टलवरून या मशीन घेतल्या आहेत, अशी माहिती वाहन विभागाचे अभियंता गिरीश पुकाळे यांनी दिली.मेन होलमधील गाळ हाताच्या पंजाप्रमाणे ही मशीन उपसा करते. यामुळे कर्मचाऱ्याला चेंबरमध्ये उतरून धोकादायक परिस्थितीत गाळ काढण्याची गरज भासणार नाही. बुधवारी (ता. ३०) दुपारी या नवीन मशीनचे लोकार्पण करण्यात येणार आहे.

## प्राध्यापक संघातर्फे राज्यव्यापी आंदोलन २६ फेब्रुवारी ते १५ एप्रिलपर्यंत आंदोलनाचे टप्पे

**सोलापूर :** राज्यातील प्राध्यापकांच्या प्रलंबित मागण्यांसंदर्भात वारंवार पत्रव्यवहार करूनही शासनाकडून त्याकडे गांभीर्याने पाहिले नाही. वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून विद्यापीठ कायद्यातील तरतुदी व सर्वोच्च आणि उच्च न्यायालयाच्या निर्णयाची अवहेलना केली आहे.



या पार्श्वभूमीवर प्रलंबित मागण्या सरकारने मान्य कराव्यात म्हणून २६ फेब्रुवारी ते १५ एप्रिल या काळात टप्प्याटप्प्याने राज्यव्यापी आंदोलन करण्याचा इशारा महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाने आज (गुरुवारी) पत्रकार परिषदेतून दिला आहे.विद्यापीठ अनुदान आयोगाच्या (यूजीसी) तरतुदीनुसार शिक्षकांना पात्र झाल्याच्या दिनांकापासून पदोन्नती मिळावी, पीएचडी व एमफील झाल्यावर प्रोत्साहनपर वेतनवाढ द्यावी, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या १०० टक्के जागा भराव्यात,कंत्राटी शिक्षकांना नियमित शिक्षकांप्रमाणे वेतन मिळावे, यूजीसीच्या तरतुदीनुसार शिक्षक निवड समिती असावी, सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार एमफील झालेल्यांना पदोन्नतीचे लाभ मिळावेत, ७१ दिवसांच्या बेकायदेशीर वेतन कपाती बाबतील सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाची तंतोतंत अंमलबजावणी करावी व उर्वरित व्याजाची रक्कम विनाविलंब द्यावी,उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार मंत्रालय स्तरावर तक्रार निवारण यंत्रणा कार्यान्वित करावी, सेट-नेट मुक्त शिक्षकांना नेमणुकीच्या तारखेपासून जुनी पेन्शन योजना लागू करावी, अशा विविध मागण्यांसंदर्भात हे आंदोलन केले जाणार असल्याची माहिती सोलापूर विद्यापीठ शिक्षक संघाचे (सुटा) अध्यक्ष डॉ. नेताजी कोकाटे यांनी पत्रकार परिषदेत दिली.दरम्यान, ३० एप्रिलपूर्वी सर्व मागण्यांवर सकारात्मक निर्णय न झाल्यास राज्यभर तीव्र आंदोलन होईल, असा इशाराही त्यांनी यावेळी दिला. त्यासंदर्भातील निवेदन संघटनेने राज्यपालांसह मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांनाही दिले आहे.

## जय महाराष्ट्र वृत्तवाहिनीचा कृषीदूत महासन्मान पुरस्काराने महेश बेदरे सन्मानित

# मुंबई येथील यशवंतराव चव्हाण सेंटर येथे उपमुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते प्रदान

**गेवराई (प्रतिनिधी)**

किसान कृषी विकास प्रतिष्ठानच्या माध्यमातून मराठवाड्यामध्ये कृषी क्षेत्रामध्ये उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महेश गणेशराव बेदरे यांच्या कृषी क्षेत्रातील कार्याची दखल घेऊन जय महाराष्ट्र वृत्तवाहिनीने मुंबई येथील यशवंतराव चव्हाण सभागृहामध्ये आयोजित केलेल्या व्हिजन २०३० या परिषदेमध्ये कृषी क्षेत्रातील कृषीदूत महासन्मान पुरस्कारासाठी गेवराई येथील कृषी भूषण महेश बेदरे यांची निवड करून राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्रजी फडवणीस यांच्या हस्ते त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

मराठवाड्यामध्ये कृषी प्रदर्शनाच्या माध्यमातून गेल्या पंधरा वर्षापासून कृषी क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या कृषिभूषण महेश बेदरे यांच्या कार्याची दखल घेऊन दि.३१ जानेवारी रोजी मुंबई येथील यशवंतराव चव्हाण सभागृहामध्ये न्यूज वृत्तवाहिनीचा व्हीजन २०३० या कार्यक्रम संपन्न झाला. या कार्यक्रमाला राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणीस, पर्यटन मंत्री गिरीश महाजन, नामदार अदिती तटकरे, जय महाराष्ट्र न्यूज चॅनलचे मुख्य संपादक चंद्रमोहन पुपाला यांच्यासह आदींची प्रमुख उपस्थितीत होती. या कार्यक्रमात महेश बेदरे यांना हा महा सन्मान पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. यां कार्यक्रमास राज्यभरातून प्रमुख व्यक्तींना विविध श्रेणीमध्ये पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. दरम्यान महेश बेदरे यांनी अत्यंत कमी वयात कृषी क्षेत्रात केलेल्या कार्याची चित्रफीत दाखवन्यात आली. याबाबत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, गिरीश महाजन यांच्यासह उपस्थित मान्यवरांनी त्यांच्या कार्याची कौतुक करत त्यांचे अभिनंदन केले. या कार्याबद्दल त्यांचे सर्वस्तरातून अभिनंदन होत आहे.



# संकटावर मात कुंडलिक खांडेंनी नवीन कार्यालय उभे केले - ना.उदय सामंत

## शिवसेना संपर्क कार्यालयाचा उपयोग सर्वसामान्यांच्या समस्या सोडवण्यासाठी होणार-कुंडलिक खांडे

**बीड । प्रतिनिधी**

महाराष्ट्राचे लोकप्रिय मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली सर्वसामान्यांची सेवा करण्यासाठी आज बीडचे जिल्हाप्रमुख कुंडलिक खांडे यांनी संकटावर मात करत नवीन संपर्क कार्यालय उभे केले ैआहे त्याचा मला अभिमान वाटतो. सर्वसामान्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी या संपर्क कार्यालयाचा उपयोग व्हावा. बीड विधासभेची जागा ही शिवसेनेचीच होती आणि शिवसेनेचीच राहिल याबद्दल कोणाच्याही मनात शंका असू नये. शिंदे साहेबांचे हात बळकट करण्यासाठी सर्व शिवसैनिकांनी मोठ्या प्रमाणात कष्ट घेण्याची आवश्यकता आहे. बीड ंहा शिवसेनेचा बालेकिल्ला होता आणि राहिलच असा विश्वास राज्याचे उद्योगमंत्री ना.उदय सामंत यांनी व्यक्त केला.तर बीडचे जिल्हाप्रमुख कुंडलिक खांडे म्हंणाले की , शिवसेना संपर्क कार्यालयाचा उपयोग सर्वसामान्यांच्या समस्या सोडवण्यासाठी होणार आहे. बीड विधानसभेची जागा ही जिल्ह्यातील शिवसैनिकांसाठी खुप महत्वाची आहे. त्यामुळे सामंत साहेब बीडची जागा ही शिवसेनेसाठीच राहिल यासाठी आपण स्वत: प्रयत्न करावेत अशी विनंती जिल्हाप्रमुख खांडे यांनी उद्योगमंत्री ना.उदय सामंत यांच्याकडे केली. अ बीड येथील जिल्हाप्रमुख कुंडलिक खांडे यांच्या नुतन जिल्हा संपर्क कार्यालयाचे उद्धाटन उद्योगमंत्री ना.उदय सामंत यांच्या हस्ते शुक्रवार दि. २ फेब्रुवारी रोजी संपन्न झाले. जालना रोड येथील नवगण प्लाझा येथे शिवसेनेचे नुतन संपर्क कार्यालय स्थापन झाले आहे. या कार्यक्रमास माजीमंत्री प्रा.सुरेश नवले, शिवसेनेचे लोकसभा संपर्कप्रमुख डॉ.विजय पाटील,जिल्हाप्रमुख कुंडलिक खांडे, रामगडाचे महंत योगीराज महाराज, बाजीराव चव्हाण, अल्पसंख्यांक आघाडीचे जिल्हाप्रमुख कामरान खान, महिला





आघाडीच्या सौ.जायभाये ताई, गोरेताई, उपजिल्हाप्रमुख जयसिंग मामा चुंगडे, गणेश उगले, परमेश्वर तळेकर, कल्याण कवचट,युवा सेना जिल्हाप्रमुक अजंय सुरवसे, गणेश डोईफोडे, पांडुरंग गवते,संतोष घुमरे, राहुल चौरे, साहिल देशमुख,भरत जाधव, गौतम नाईकवाडे, नसीर खान, सुनिल सोनवणे, डांगे साहेब, उत्तम खटाणे,गणेश धोंडे,अविनाश पुजारी,बाळासाहेब राठोड,अशोक घुमरे, गणेश खांडे, भास्कर जगताप, शौकत भाई, वैभव शिंदे, जिलानी सय्यद,गोवर्धन काशिद यांची प्रमुख उपस्थिती होती.याप्रसंगी कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना कुंडलिक खांडे म्हणाले की, बीड विधानसभा क्षेत्रात आम्ही रात्रीचा दिवस करुन मेहनत करत आहोत. बीडची जागा ही शिवसेनेची राखीव ठेवण्यात यावी. बीडच्या सर्वसामान्य शिवसैनिकांना न्याय देण्यासाठी बीड विधानसभेची जागा शिवसेनेलाच द्या अशी मागणी त्यांनी केली. या प्रसंगी माजी मंत्री सुरेश नवले म्हणाले की, जिल्हाप्रमुख कुंडलिक खांडे यांच्या संपर्क कार्यालयातून विधायक कार्याची पताका फडकत रहावी. नगर रोडचे राजकारणी मी सांभाळतो तुम्ही जालना रोड सांभाळा. शिंदे साहेबांचे हात बळकट करण्यासाठी आम्ही सर्वजण प्रयत्नशिल असल्याचे माजीमंत्री नवले म्हणाले.उपस्थित शिवसैनिकांना मार्गदर्शन करताना उद्योगमंत्री उदय सामंत म्हणाले की, शिदे साहेबांचा इतका कार्यक्षम मुख्यमंत्री महाराष्ट्राला लाभला नव्हता. सर्वसामान्यांचा विकास हाच शिंदे साहेबांचा ध्यास आहे. बीड विधानसभेचे तिकिट हे शिवसैनिकालाच मिळणार आहे. आतापासूनच शिंदे साहेबांनी घेतलेले निर्णय हें तळागाळात पोहचवण्याचे काम तुम्ही करा. जिल्हाप्रमुख कुंडलिक खांडे यांची धडाडी कौतुकास्पद आहे. संकटातून स्वत:ला सावरत शिवसैनिकांना हक्काचे व्यासपीठ या संपर्क कार्यालयामुळे मिळाले आहे. जिथे तुम्हाला माझी गरज लागेल त्या ठिकाणी फक्त आवाज द्या मी खांडे यांच्या पाठीशी खंबीरपणे असल्याचे ना.उदय सामंत म्हणाले. जिल्हाप्रमुख खांडे यांचे काम खुपच चांगले आहे. खांडेंच्या जनता दरबारात नक्कीच सर्वसामान्यांचे, शिव सैनिकांचे प्रश्न सोडवले जातील यात शंका नाही. बीडच्या एमआयडीसी अंतर्गत रस्त्यांसाठी मी लवकरच मोठा निधी देणार असल्याचे ना.उदय सामंत म्हणाले. या प्रसंगी महिला आघाडीच्या जिल्हाप्रमुख सौ.जायभाये ताई, उपजिल्हाप्रमुख सौ.गोरेताई,शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख परमेश्वर तळेकर,गौतम नाईकवाडे,बाळासाहेब मस्के, गणेश जगताप,गणेश घोडे,गणेश घोडके,समिर बेग,राजेभाऊ नवले,देवराव घोडके,हनुमान जाधव,संतोष घुमरे,गणेश डोईफोडे, अविनाश पुजारी, बाळासाहेब राठोड, अशोक घुमरे, उबाळे,नसीर खान,भास्कर सानप,गणेश पवार, माऊली घुमरे, जितेश काळकुटे,अभिमान पडूळे, शौकतभाई, सरपंच नवले, राहुल साळुंके, बापुराव नवले,वैभव शिंदे, श्रीमंत घोडके, श्रीमंत खांडे, लक्ष्मण नवले,सुसेन खरसाडे,रांजवण,रमेश शिंदे,सखाराम सालपे,कल्याण घोडके, अशोक बिडवे, कृष्णा राठोड, अनिरुध्द घोडके, साहेबराव राठोड, जिलानी सय्यद,पांडुरंग गवते, कृष्णा फरताळे, अ‍ॅड.विनायक जाधव,विकास गवते,सुदर्शन मोरे,बाबा घोडके,पांडुरंग मोरे,दत्ता जाधव,विकास घोडके, अमोल डोईफोडे,सोनू कवडे, मधुकर डोईफोडे, शुभम घोडके, भारत पिंगळे,किशोर काळकुटे, सुंदर पवार, शिवदास शेळके,रामा बांड,लहू खांडे, महेंद्र वीर,बाबु साळुंके, शाहू बोराडे, सुर्यकांत काळे, कृष्णा राऊत

### जनता दरबार भरवणारे कुंडलिक खांडे हे राज्यातील पहिले जिल्हाप्रमुख- नामदार उदय सामंत

**सर्वसामान्यांच्या समस्या सोडवण्यासाठी शिवसेनेच्या संपर्क कार्यालयात जनता दरबार घेणारे कुंडलिक खांडे हे राज्यातील पहिले शिवसेनेचे जिल्हाप्रमुख ठरले आहेत त्याबद्दल मी त्यांचे मनस्वी अभिनंदन करतो जनता दरबाराचा उपयोग हा तळागाळातील लोकांसाठी हक्काचे व्यासपीठ ठरणार आहे या जनता दरबारात प्रश्नांची सोडवणूक आणि समस्यांचा तात्काळ निपटारा होणार असून खांडे यांचा हा आदर्श उपक्रम सर्वच जिल्हाप्रमुखांनी राबवावा असे आवाहन नामदार उदय सामंत यांनी केले.**

# बस सुरू करण्याच्या मागणीकडे परिवहन मंडळाचे दुर्लक्ष

## आ.सौ.मेघना बोर्डीकर यांच्या मागणीला केराची टोपली

**कौसडी । प्रतिनिधी**

जिंतूर मार्ग कौसडी, बोरी, वालूर मानवत बस सुरू करण्याच्या मागणीसाठी अनेक निवेदनाद ग्रामस्थांनी परिवहन मंडळाकडे दिले होते परंतु या निवेदनाकडे जिल्हा परिवहन मंडळ व जिंतूर आगार प्रमुख यांचे दुर्लक्ष होताना दिसत आहे.

वालूर, गुळखंड, आडगाव दराडे, कुपटा, गव्हा, गुळखंड फाटा, हट्टा, कान्हड,कौसडी यासह इतर गावांमध्ये मागील अनेक वर्षापासून परिवहन मंडळाची बस सेवा नसल्याने येथील ग्रामस्थांना बोरी जिंतूर मानवत या बाजारपेठत जाण्यासाठी वाहने नसल्याने नाहक त्रास सहन करावा लागत असतो. तसेच ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शहरात शिक्षण घेण्यासाठी ये जा करावी लागते परंतु बस सेवा सुरू नसल्याने या विद्यार्थ्यांना सुद्धा खाजगी वाहनाचा उपयोग करावा लागत असतो. या समस्या ग्रामस्थांनी लक्षात घेत



परिवहन मंडळाकडे जिंतूर बोरी कौसडी गुळखंड फाटा वालूर मार्ग मानवत तर मुक्कामी हट्टा ही बस सेवा सुरू करण्याची मागणी केली होती परंतु या मागणीकडे जिंतूर आगार प्रमुख तसेच परभणी विभाग नियंत्रक अधिकारी यांनी दुर्लक्ष केले आहे. मागील अनेक दिवसापासून ही बस सेवा सुरू करण्यासाठी ग्रामस्थ प्रयत्न करत आहे परंतु परिवहन मंडळाच्या अधिकाऱ्यांच्या दुर्लक्षामुळे ग्रामस्थांच्या प्रयत्नाला यश येत नाही. वरिष्ठ अधिकाऱ्यांनी या बाबीकडे लक्ष देऊन जिंतूर मार्ग बोरी कौसडी गुळखंड फाटा वालूर मानवत ते मुक्कामी हट्टा ही बस सेवा सुरू करून ग्रामस्थांचे व विद्यार्थ्यांची होणारी अडचण दूर करावी. अन्यथा ग्रामस्थ लोकशाही मार्गाने आंदोलन करणार असा इशारा ग्रामस्थांमधून दिला जात आहे.जिंतूर सेलू मतदारसंघाचे आ.सौ. मेघना बोर्डीकर यांनी दिनांक ९ जानेवारी रोजी जिंतूर मानवत बस सेवा सुरू करण्याच्या मागणीसाठी जिल्हा विभागीय नियंत्रक अधिकारी यांच्याकडे निवेदन दिले होते परंतु या निवेदनाला सुद्धा विभागीय नियंत्रक अधिकारी यांनी केराची टोपली दाखवत या बस सेवा च्या मागणीकडे दुर्लक्ष केले आहे.

# महात्मा गांधी यांच्या स्वप्नातील स्त्री पूर्ण स्वतंत्र आणि निर्भीड-डॉ.शैलजा बरूरे

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

स्त्री पुरुषांपेक्षा सामर्थ्यवान असते म्हणून तिला बांधून ठेवले जाते. स्त्री अजूनही भयमुक्त झालेली नाही. त्यांच्या उपवास, त्याग आणि सर्जनशील यामधून समाधान मिळते. कस्तुरबा गांधी काळ्या कायद्याच्या विरोधात लढल्या होत्या. दक्षिण आफ्रिका येथे त्यांनी लढा दिला आणि यश मिळवले होते. त्यानंतर स्त्री सामर्थ्यवान बनण्यासाठी तिला शिक्षण दिले पाहिजे. महात्मा गांधी जाती धर्म भेद संपवण्यासाठी पुढे आले म्हणून तर त्यांची हत्या झाली अन्याय, अत्याचार विरोधीत सर्व संघटनांनी एकत्र येऊन काम केले पाहिजे, असे आवाहन त्यांनी केले होते. गांधीजी यांनी स्त्रीची सर्व कामे केली होती. माणूस म्हणून समान संधी आणि दर्जा दिला होता. म्हणून गांधी जिवंत ठेवण्यासाठी महिला मेळावे झाले पाहिजेत, असेही डॉ बरुरे म्हणाल्या. हा देश गांधीचा म्हटले जाते. गांधी कधी मरत नसतो. तो कामात आहे, त्याग, आत्मबल, प्रेम, सत्य, अहिंसा, प्रामाणिकपणा यामध्ये गांधी आहे. तो कधीच संपणार नाही. असे सांगितले. गांधी यांच्या जीवनावर विस्तृत माहिती




सांगितली.

महात्मा गांधींच्या स्मृती दिना निमित्त आंतरभारती, आंबाजोगाईच्या वतीने महिला मेळावा घेण्यात आला. त्यात डॉ शैला बरुरे यांनी प्रमुख मार्गदर्शन केले.

'खरा तो एकच धर्म जगाला प्रेम अर्पावे' या गीताने मेळाव्याची सुरुवात झाली. अनिता कांबळे यांनी प्रास्ताविक केले तर सुत्रसंचलन ज्योती शिंदे यांनी केले. यावेळी भगवंत पाळंवदे, स्वरूपा कुलकर्णी, संजीवनी देशमुख, अ‍ॅड. शोभाताई लोमटे, काटे ताई, सुनिता कात्रेला, अ‍ॅड संतोष पवार, यांची भाषणे झाली.

या कार्यक्रमाला महिलांची मोठ्या संख्येने उपस्थित होती. अ‍ॅड कल्याणी विर्धे यांनी आभार मानले.

या कार्यक्रमाला आशाताई हबीब, कमलताई बरूळे, सीमाताई शेंगुळे, रंजना कराड, सुरेखा सिरसट, सुनिता कात्रेला, तिलोत्तमा पतकराव, दिपाताई स्वामी, जोगदंड ताई, महावीर भगरे, दत्ता वालेकर, शरद लंगे, आदी उपस्थित होते.

# उजनी धरणातून सोडण्यात येणारे पाणी तात्काळ बंद करण्यासाठी भिगवणमध्ये धरणग्रस्तांचा रस्ता रोको

**पुणे**-दि.१ रोजी उजनी धरणातून गरज नसताना सोडण्यात येत असलेले पाणी तात्काळ बंद करणे व उजनीच्या वरच्या धरणातून उजनीत प्रत्येकी दोन वेळा १० टी एम सी पाणी सोडण्यात यावे या मागणीसाठी इंदापूरसह करमाळा, दौंड, कर्जत तालुक्यातील धरणग्रस्त शेतकऱ्यांनी एक फेब्रुवारी रोजी दुपारी एकच्या सुमारास भिगवण येथे रास्ता रोको आंदोलन केले. यात मोठ्या संख्येने धरणग्रस्त शेतकरी सहभागी झाले होते. कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलिसांचा चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

या रास्ता रोको आंदोलनात करमाळा धरणग्रस्त संघर्ष समितीचे अध्यक्ष प्रा.शिवाजीराव बंडगर,इंदापूर तालुका धरणग्रस्त संघर्ष समितीचे अध्यक्ष महारुद्र पाटील, बारामती ॲग्रोचे व्हाईस चेअरमन सुभाष गुळवे, सोलापूर जिल्हा परिषदेच्या मा.सदस्या सविता राजेभोसले,शहाजी जाधव, अंकुश पाडुळे,धनंजय डोंगरे,अमोल भिसे, प्रा.रामदास झोप, अरविंद जगताप,भिगवणचे मा. सरपंच परागभाऊ जाधव,मकाई साखर कारखान्याचे संचालक अजित झांजुर्णे, सामाजिक कार्यकर्ते ललीत पाटील, राजेंद्र धांडे,डॉ.गुळवे, शामराव वाघ,दादासाहेब थोरात,बाळासाहेब मोरे,शरद काळे,खानवटे गावचे मा.सरपंच अशोकराव गायकवाड, विष्णुपंत देवकाते,



शरदराव ढवळे, उदयराजे भोसले, यांसह अनेकांनी सहभाग नोंदवला. उजनी धरणग्रस्त संघर्ष समितीच्या वतीने आपल्या मागण्यांचे लेखी निवेदन कार्यकारी अभियंता रावसाहेब मोरे उजनी धरण आणि नायब तहसिलदार अनिल ठोंबरे यांना देण्यात आले आहे.या वर्षी पाऊस कमी पडल्याने उजनी धरण केवळ ६०.६६ टक्के इतकेच भरलेले होते. परंतु अशी स्थिती असताना देखील ३ नोव्हेंबर ते ३० डिसेंबर या कालावधीत गरज नसताना कालव्याद्वारे पाणी सोडण्यात आले केवळ १० दिवसांच्या अंतराने दुसरे आवर्तन ११ जानेवारी पासून सोडण्यात आलेले आहे. सोलापूर शहरासाठी पाणी पिणेकरीता नदीतून पाणी सोडल्याने आज उजनी धरण मायनस (वजा) ६.०५ टक्क्याच्या खाली गेले आहे. त्यामुळे उजनी धरणासाठी त्याग केलेल्या इंदापूर, करमाळ, दौंड, कर्जत आदी तालुक्यातील मुळ धरणग्रस्तांवर अन्याय होत आहे.अशी भुमिका आंदोलनकर्त्यांनी मांडली.वास्तविक या धरण ग्रस्तांनी धरण निर्मितीसाठी प्रचंड त्याग करताना आपली घरे, जमिनी, गावे व आपल्या श्रद्धा पाण्याखाली गाडलेल्या आहेत त्यामुळे त्यांच्या हक्काच्या पाण्यावर गदा येता कामा नये.त्यामुळे अनावश्यक रित्या चालु असलेले आवर्तन तात्काळ बंद करण्यात यावे. उजनी धरण ग्रस्तांसाठी दिलासा दायक स्थिती निर्माण होणेसाठी उजनी धरणाच्या वरील १९ धरणातील एकूण २० टी एम सी पाणी प्रत्येकी १० या प्रमाणे तात्काळ सोडण्यात यावे. महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण यांनी ठोक जलशुल्क निर्धारण आदेश दि. २९/०३/२०२२ रोजींचा आदेश हा शेतक-यांवर अन्याय कारक असलेने तो रद्द करण्यात यावा.सोलापूर शहराला पाणी सोडण्यासाठी समांतर जलवाहिनीचे काम तात्काळ पूर्ण करावे.कालवा सल्लागार समितीमध्ये इंदापूर तालुक्यातील दोन, करमाळा तालुक्यातील दोन व कर्जत तालुक्यातील एका उजनी धरण ग्रस्त प्रतिनिधिची निवड करण्यात यावी. तसेच कृष्णा भीमा स्थिरीकरण योजना कार्यान्वित करण्यात यावी अशा मागण्या करण्यात आल्या आहेत.यावेळी मोठ्या संख्येने धरणग्रस्त शेतकरी उपस्थित होते.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .